| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | – | १७.१०.२०२५ |
| नोंदणी दिनांक | – | १७.१०.२०२५ |
| निकाल दिनांक | – | १२.०३.२०२६ |
| कालावधी – ०० व. ०४ म. २६ दि. | | |

<table>
<tr><td rowspan="2">MHRG140025592025</td><td colspan="2"><u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उरण, ता. उरण, जि. रायगड</u><br><u>यांचे न्यायालयात</u><br><br>(पिठासीन अधिकारी : एम. एस. काझी)<br>(न्यायनिर्णय दिनांक १२.०३.२०२६ रोजीचा)<br><br>नियमित फौजदारी खटला क्र. १२१/२०२५<br>नि.क्र. २३/ब</td></tr>
<tr><td colspan="2">उरण पोलीस स्टेशन येथील गुन्हा नोंद क्र. १४१/२०२५<br>भारतीय न्याय संहिता कलम १०६ (१), १२५ (अ), १२५ (ब), २८१ तसेच मो.वा.का. कलम १८४ अन्वये</td></tr>
<tr><td>सरकार पक्ष / फिर्यादी</td><td></td><td>महाराष्ट्र शासन<br>उरण पोलीस ठाणे तर्फे<br>श्री. छोटेलाल श्यामलाल चौहान</td></tr>
<tr><td>विधिज्ञ</td><td></td><td>सहाय्यक सरकारी अभियोक्ता,<br>श्री. पी. बी. देशमाने</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| आरोपी | | सुभाष शंकर चक्रवर्ती,<br>वय २६ वर्षे, व्यवसाय – नोकरी,<br>रा. घर नं.२७७३, डाउरनगर, ता. उरण, जि. रायगड. |
| विधिज्ञ | | श्रीमती सीमा जाधव |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २१.०५.२०२५ |
| फिर्याद दाखल तारीख | २१.०५.२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १७.१०.२०२५ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | ११.०३.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १२.०३.२०२६ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | -- |
| निकालाची तारीख | १२.०३.२०२६ |
| शिक्षा झाल्याची तारीख, जर शिक्षा झाली असेल तर | -- |

| आरोपीचा अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | फौ.प्र.सं. च्या कलम ४२८ साठी खटला सुरु असताना आरोपीचा कारागृहातील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुभाष शंकर चक्रवर्ती | २२.०५. २०२५ रोजी भा.ना.सु. सं. कलम ३५ (३) प्रमाणे नोटीस | ११.०३. २०२६ | भारतीय न्याय संहिता कलम १०६ (१), १२५ (अ), १२५ (ब), २८१ तसेच मो.वा.का. कलम १८४ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |

## <u>साक्षीदारांची यादी</u>

### अ. अभियोगपक्ष –

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| सा.क्र. १ | छोटेलाल श्यामलाल चौहान | फिर्यादी | १९ |

### ब. आरोपी साक्षीदार, जर असेल तर –

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

### क. न्यायालयाचा साक्षीदार, जर असेल तर –

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

## निशाण्यांची यादी

### अ. अभियोगपक्ष –

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | २० | घटनास्थळ पंचनामा |
| २ | २१ | मरणोत्तर पंचनामा |
| ३ | २२ | शवविच्छेदन पंचनामा |

### ब. आरोपीपक्ष –

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| **निरंक** | | |

### क. न्यायालयाची निशाणी –

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १३ | दोषारोप |

### ड. महत्वाच्या बाबी –

| अनु.क्र. | महत्वाच्या बाबी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

# न्यायनिर्णय

(जाहीर दिनांक १२.०३.२०२६)

आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम १०६ (१), १२५ (अ), १२५ (ब), २८१ तसेच मो.वा.का. कलम १८४ अन्वये आरोप निश्चित करुन खटला चालविणेत आला.

२. अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे,

घटना ही दिनांक २१.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.३० ते ०७.४५ वाजताचे दरम्यान चारफाटा ते तेलीपाडा रोडवर, तेलीपाडा कमान पुढील डांबरी रस्त्यावर ता. उरण येथे घडली. आरोपी हा त्याच्या ताब्यातील मोटार सायकल क्रमांक एमएच–४३–एजी–३७७८ ही भरधाव वेगाने रस्त्याच्या दिसत्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हयगईने अविचाराने चालवुन फिर्यादीची पत्नी हेवंती छोटेलाल चौहान हिस ठोकर मारून अपघात करून तिच्या डोक्यास गंभीर दुखापत करून व तिच्या डाव्या पायाच्या टाचेस दुखापत करून तिचे मरणास कारणीभुत ठरला म्हणुन फिर्यादीने प्रस्तुत फिर्याद दिली.

३. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उरण पोलीस ठाणे मध्ये आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम १०६ (१), १२५ (अ), १२५ (ब),

२८१ तसेच मो.वा.का. कलम १८४ अन्वये शिक्षापात्र अपराधासाठी गुन्हा रजि.नं. १४१/२०२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार अविनाश पाटील यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. साक्षीदारांची टिपणे नोंदवली व जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र प्राप्त केले. वाहनाची कागदपत्रे प्राप्त करून दाखल केली. तपासाअंती त्यांनी प्रस्तुतच्या आरोपीविरुध्द सबळ पुरावा आढळून आल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम १०६ (१), १२५ (अ), १२५ (ब), २८१ तसेच मो.वा.का. कलम १८४ खालील शिक्षापात्र अपराधासाठी नि.क्र. १३ कडे आरोप निश्चित केले. ते आरोपीला वाचून दाखविले व मराठीत समजावून सांगितले. आरोपीविरूध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा मिळून न आल्याने आरोपीचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिता चे कलम ३५१ प्रमाणे जबाब नोंदवण्यात आला नाही.

५. वरील सर्व बाबींचा विचार करता या प्रकरणाच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी माझे पुढे उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | दिनांक २१.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.३० | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | ते ०७.४५ वाजण्याच्या सुमारास चारफाटा ते तेलीपाडा रोडवर, तेलीपाडा कमान पुढील डांबरी रस्त्यावर, ता. उरण येथे आरोपी त्यांच्या ताब्यातील मोटारसायकल क्र. एमएच–४३–एजी–३७७८ हा रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणाने भरदाव वेगात चालवून फिर्यादी व त्याच्या पत्नीला ठोकर देऊन अपघात केला व अपघातामध्ये तिच्या डोक्यास व डाव्या पायाच्या टाचेस गंभीर दुखापत करून त्याचे मरण्यास कारणीभूत ठरून भा.न्या.सं. कलम १०६ (१) प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | – | नाही |
| २. | वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल क्र. एमएच–४३–एजी–३७७८ हयगयीने निष्काळजीपणे व बेदरकारपणे चालवून फिर्यादीची पत्नी हेवंती चौहान यांना दुखापत केली म्हणुन आरोपीने भा.न्या.सं. कलम १२५ (अ) अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | – | नाही |
| ३. | वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्यांच्या ताब्यातील वाहन हयगयीने निष्काळजीपणे व बेदरकारपणे चालवून फिर्यादीची पत्नी हेवंती चौहान यांना गंभीर दुखापत केली म्हणुन भा.न्या.सं. कलम | – | नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| | १२५ (ब) अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | | |
| ४. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल क्र. एमएच–४३–एजी–३७७८ हा मानवी जीवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत गर नुकसान पोहचण्याचा संभव आहे अशा बेदरकारपेण किंवा हयगयीने चालवुन आरोपीने भा.न्या.सं. कलम २८१ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | – | नाही |
| ५. | वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन इतरांची सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे वेगात चालविले म्हणुन आरोपीने मोटार वाहन अधिनियमाचे कलम १८४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | – | नाही |
| ६. | अंतिम आदेश काय ? | – | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. १ ते ५ करीता</u>** –

६. वरील सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता एकत्रीतपणे अवलोकनार्थ घेतले आहेत.

७. आरोपीवर ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द करण्याकरता अभियोग पक्षाने फिर्यादी छोटेलाल श्यामलाल चौहान (निशाणी क्र. १९) यास साक्षीदार क्र.१ म्हणून तपासले. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २४.०५.२०२५ रोजी त्यांच्या पत्नीचा अपघात झाला होता. त्यात तिचा मृत्यू झाला. त्यानंतर मरणोत्तर पंचनामा झाला. पुराव्यात त्यांना फिर्याद दाखवली असता त्यांनी त्यावरील केवळ सही मान्य करून त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य न केल्याने त्यास सरकारी वकीलांनी सूचक प्रश्न विचारले. परंतु, अभियोगपक्षास उपयुक्त असा कोणताही पुरावा पटलावर आला नाही. सदर साक्षीदाराने त्यांची व आरोपीचे आपसात न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे मान्य केले आहे. तसेच सदर तडजोड ही राजीखुशीने झाली असल्याचे व आणखी साक्षीदार तपासायचे नसल्याचे कथन केले आहे.

८. तपासादरम्यान सादर करण्यात आलेल्या पुरावा व साक्षीदाराच्या कथनांतून असे स्पष्ट होते की, सदर प्रकरणातील फिर्यादी हा एकमेव प्रत्यक्ष साक्षीदार असून त्याने न्यायालयात साक्ष देताना अपघात कसा घडला याबाबत कोणताही ठोस

पुरावा दिलेला नाही. त्याने फिर्यादीतील मजकूर माहिती नसल्याचे सांगितले असून केवळ त्यावरील सही मान्य केली आहे. तसेच त्याने आरोपी व स्वतःमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे स्पष्टपणे मान्य केले आहे. त्यामुळे सदर साक्षीदाराने अभियोगपक्षाच्या कथनास पाठबळ दिलेले नाही. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य न केल्याने त्यास सरकारी वकीलांनी उलटतपासणीसाठी सूचक प्रश्न विचारले. मात्र त्या उलटतपासणीतूनही अभियोगपक्षाच्या कथनास पुष्टी देईल असा कोणताही ठोस पुरावा पटलावर आलेला नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षाच्या बाबतीत उपयुक्त ठरत नाही. प्रकरणातील फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झालेली असल्याने फिर्यादी पुढील कारवाई करण्यास इच्छुक नसल्याचेही त्याने स्पष्ट केले आहे. त्यामुळे अभियोगपक्षाने पुढील साक्षीदार तपासण्यास नकार दिला आहे. परिणामी, प्रकरणातील मुख्य साक्षीदारानेच अभियोगपक्षाच्या कथनास समर्थन दिलेले नसल्याने आरोपीविरुद्धचा आरोप शंका निरसन करून सिद्ध करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरला आहे. फौजदारी न्यायशास्त्रानुसार आरोपीचा दोष शंका निरसन करून सिद्ध करणे ही जबाबदारी अभियोगपक्षावर असते. मात्र प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्यावरून आरोपीविरुद्ध ठेवण्यात आलेले दोषारोप सिद्ध होत नाहीत. अशा परिस्थितीत आरोपीस दोषी धरणे न्यायोचीत ठरणार नाही. परिणामी, अभियोगपक्ष

आरोपीविरुद्ध भा.न्या.सं. कलम १०६ (१), १२५ (अ), १२५ (ब), २८१ तसेच मो.वा.का. कलम १८४ अन्वये ठेवलेले आरोप शंका निरसन करून सिद्ध करण्यात अपयशी ठरला आहे. त्यामुळे आरोपीस त्याचा लाभ देणे आवश्यक आहे.

९. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आरोपीचा गुन्हयाशी संबंध जोडणारा कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभियोगपक्षाने सादर केलेला नाही. पुरेशी संधी देउनही अभियोगपक्षाने स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासलेले नाहीत. पटलावरील अभिलेख पाहता फिर्यादी व आरोपीची आपसात तडजोड झाल्याचे दिसते. त्यामुळे फिर्यादीने खटला पुढे चालवायचा नाही अशी पुरशिस पटलावर दिलेली आहे. आरोपीविरूद्ध कुठलाही पुरावा आलेला नसल्याने त्याच्यावर लावलेले कोणतेही आरोप सिध्द होत नाहीत. त्यामुळे प्रस्तुतच्या खटल्यामध्ये अभियोगपक्षाने सादर केलेला एकंदरीत पुरावा लक्षात घेता प्रस्तुत आरोपीवर ठेवण्यात आलेले भा.न्या.सं. कलम १०६ (१), १२५ (अ), १२५ (ब), २८१ तसेच मो.वा.का. कलम १८४ अन्वयेचे दोषारोप निर्विवादपणे सिध्द करण्यामध्ये अभियोगपक्षाला अपयश आले आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. १ ते ५ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. ६ करीता** –

१०. मी यापुर्वीच मुद्दा क्र. १ ते ५ ला नकारार्थी उत्तर दिले असल्याने,

आरोपीची निर्दोष मुक्तता करणे क्रमप्राप्त ठरते. सबब, मी खालीप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. आरोपी सुभाष शंकर चक्रवर्ती यांची भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७१ (१) अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०६ (१), १२५ (अ), १२५ (ब), २८१ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ नुसार शिक्षापात्र असलेल्या गुन्हयांतून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. त्याला सोडून देण्यात येते.

२. आरोपीचा जामीन रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ मधील तरतुदीप्रमाणे रक्कम रूपये १५,०००/– चा जामीन द्यावा. तो जामीन सहा महिन्यांकरीता असेल.

४. आरोपीला खुले करण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

सही/–

उरण, (एम. एस. काझी)
दिनांक – १२.०३.२०२६ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण